## – प्रकरण दुसरे –

### " ग्रामीण, प्रादेशिक कादंबरी म्हणून 'तुंबाडचे खोत' या कादंबरीचा स्थूल परिचय "

श्री.नां.च्या संपूर्ण वाड्.मयाचा आढावा घेतल्यानंतर त्यांच्या 'तुंबाडचे खोत' या दीर्घ कादंबरीचा ग्रामीण व प्रादेशिक कादंबरी म्हणून परिचय करणे महत्वाचे वाटते. 'तुंबाड' गावची वसाहत नेमकी केंव्हा झाली याचा निर्णय करता येत नसला तरी इ.स. 1502 मध्ये युसुफ अदिलशहाने दाभोळला ज्या सुभेदाराला नेमले तो हुषार दूरदृष्टीचा होता. त्याने खोतीवतनदारी सुरू केली. मात्र तुंबाडची स्थापना मोरे अंबाजी नामक ब्राम्हणाने केली. त्यातूनच पुढे मोरोंचा मोरया झाला. मोरयाचा माळ, मोरयाची पारवाडी, लिंबाडच्या डोंगरांचा हरणासारखा आकार हे प्रदेश दिसतात. तुंबाडच्या जन्मकाळाचा अंदाज काढता येतो. त्यामध्ये चतु:सिमांचा उल्लेख मिळतो. उत्तरेस बांडेवाडी, दक्षिणेस गजणसाखर जमीन, वरणगावची खाडी असा उल्लेख मिळतो.

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' मध्ये एकाच कुटुंबातील चार पिढयांचा आढावा त्यांच्या सगेसोयरे, मित्रमंडळी यांना घेऊन घेतला आहे. ग्रामीण भाग मुख्यत: रेखाटला गेला आहे. प्रादेशिकता म्हणून कोकणचे दर्शन घडते. कोकण प्रदेश हा मागसलेला भाग असला तरी कोकणचे दर्शन हे कोणालाही मोहिनी घालणारे असते. उंच-उंच डोंगररांगा त्याच्या पायथ्याला वसलेले छोटेसे गांव ज्या गावाचा आणि जगाचा संबंध येणे म्हणजे कपिलाषष्ठीचा योगच म्हणावा लागतो.

श्री.नांच्या ग्रामीण व प्रादेशिकतेचा विचार करताना त्यांचे पुर्वकालीन व समकालीन आणि ग्रामीण व प्रादेशिकतेची निर्मिती पाहणे योग्य वाटते.

ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला 1925 ला सुरवात झाली तर प्रादेशिकतेचे 1927-28 मध्ये वि.स. सुखटणकरांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' कथेपासून सुरूवात झाली. मात्र ग्रामीण, प्रादेशिकतेच्या निर्मितीबद्दल डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात – " 'ग्रामीण आणि प्रादेशिक' या वाड्.मयाबद्दल सुसंगत असा अभ्यास झालाच नाही ही वस्तुस्थिती मात्र आहे. एखादा दुसरा लेख, एखांदे दुसरे कथांचे संपादन या पलीकडे मराठी समीक्षेने या वाड्.मयाची दखल घेतलेली नाही." [1]

ग्रामीण साहित्य व प्रादेशिक यांचा संबंध असतो मात्र ग्रामीणतेचा केंद्र हा व्यक्ति तर प्रादेशिकतेमध्ये समुहकेंद्रितता दिसते. महायुद्धोत्तरकालीन वाड्.मयामध्ये ग्रामीण लेखनास सुरूवात झाली त्यामध्ये प्रादेशिकतेने हरिभाऊंच्या 'सदाशिव पेटी' नंतर ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आणि नागर जीवनाची संस्कृतीच कमी प्रमाणात निर्माण होऊ लागली. ग्रामीण व प्रादेशिकतेबद्दल बापट व गोडबोले म्हणतात – "ज्या भू-भागाची निवड कथानकाच्या पार्श्वभूमीसाठी करावयाची त्या भू-भागाच्या नैसर्गिक सृष्टीचे यथावत चित्रण करीत असतानाच तेथील समाजजीवनाचे, चालीरीतींचे,

संस्कृतीचे व प्रसंगी तेथील विशिष्ठ बोलभाषेचे प्रतिबिंब कादंबरीत उमटल्यानेच ती कादंबरी या नावाला सार्थ ठरते. "प्रादेशिक कादंबरी हा वस्तुतः वास्तववादी कादंबरीलाच फुललेला घुमारा आहे." [2]

प्रादेशिक कादंबरी हा शब्द इंग्रजी लेखक हार्डी व ॲरनॉल्डबेनेट यांच्यामुळे इंग्रजीत प्रथम आला व नंतर मराठी समीक्षेत आला."

"प्रादेशिक कादंबरी आणि ग्रामीण कादंबरी यांच्या घटकात मूलभूत फरक असल्याचे दिसते. ग्रामीण कादंबरीत ग्राम हा घटक महत्वाचा असून त्याचा अर्थ खेडे असा आहे. ग्रामीण कादंबरीत ग्रामजीवनाप्रमाणे (लोकजीवन) अविष्कार बदलू शकतो. अशी ग्रामीण कादंबरी विशिष्ट रूपात प्रादेशिक कादंबरी म्हणून अविष्कारित झालेली असते. प्रादेशिक कादंबरीत विशिष्ट भू-प्रदेशाला आणि त्या प्रदेशातील लोकजीवनाला महत्व दिलेले असते." [3]

श्री.नांचे समकालीन पाहिले तर त्यामध्ये श्री द.र. कवठेकर, गो.नि. दांडेकर, पु.भा. भावे, विभावरी शिरूरकर, सौ. ज्योत्स्ना देवधर, वि.वा. शिरवाडकर, बा.भ. बोरकर, शिवलकर, पु.शि. रेगे, प्रा. गंगाधर गाडगीळ, प्रा. भालचंद्र नेमाडे, जयवंत दळवी, चि. त्र्यं. खानोलकर, भाऊ पाध्ये, उद्धव शेळके, रणजित देसाई, आनंद यादव, श्री.ज. जोशी, व्यंकटेश मांडगुळकर असे महत्वपूर्ण कादंबरीकार दिसून येतात.

श्री.नां.च्या समकालीनांचा विचार करताना ज्यांना प्रादेशिक कादंबरीकार म्हटले ते कै. र.वा. दिघे हे श्री.नांचे पुर्वकालीन मात्र प्रादेशिकतेमध्ये दोघांना एकत्र जोडता येते. र.वा. दिघ्यांच्या 'पाणकळा'ने (1939) त्यांना प्रसिद्धी दिली ती प्रादेशिकता कोकणातीलच. मात्र त्यांच्या पूर्वीच प्रादेशिकता दिसते पण खरे प्रादेशिकतेचे दालन दिघ्यांपासूनच प्रादेशिकता हा शब्दप्रयोग रूढ झाला. श्री. ना. हे दिघ्यांच्या 'सराई' या कादंबरी वेळी 'एलगार' व 'हद्‌दपार'लिहून समकालीन ठरतात. दिघे हे रोमॅन्टीक वृत्तीचे कादंबरीकार तसेच स्वप्नरंजन व वास्तवता उल्लेखनीय ठरते. मात्र दिघ्यांची कादंबरी फडक्यांच्या वळणाची वाटते.

गो.नि. दांडेकर हे प्रादेशिकतेमध्ये विविधता आणतात. मात्र या दोघांच्या पेक्षा उजवे श्री.ना. ठरतात. खास निसर्गाचे वर्णन करत नाहीत. अपवाद 'एल्गार व हद्‌दपार' होय. निसर्गाशी समरसून गेलेले किंबहुना निसर्गानेच ज्याला व्यक्तित्व दिले आहे असे प्रादेशिक चित्रण हे श्री.नांचे निसर्गवर्णन वैशिष्टय आहे. श्री.नां. नी कोकण व मुंबई एवढाच प्रदेश घेतला आहे. प्रादेशिक विविधता व विपुलतेमध्ये गो.नि. दांडेकर हे मात्र श्री.नां.च्या पुढे आहेत. मात्र निसर्ग व मानव यांच्या तपशीलाची मर्यादा ठेवली नाही. दांडेकरांच्या कादंबऱ्या रंजन व

बोधवादाने विकसीत झाल्या. व्यंकटेश माडगुळकरांची 'बनगरवाडी' ही कलाकृती प्रादेशिकतेच्या दृष्टीने उच्च आहे. श्री.नां.च्या कादंबरी विश्वापेक्षा मोठीच वाटते.

महायुद्धोत्तर कालखंडामध्ये कर्तबगार कादंबरीकार म्हणून कै. चिं.त्र्यं. खानोलकर व श्री.ना. पेंडसे हे दोघेच ठरतात. त्यासाठी श्री.नांचा विचार करणे योग्य वाटते.

ग्रामीण व प्रादेशिकतेचा विचार करताना आनंद यादव यांचा अभिप्राय महत्वाचा वाटतो. ते म्हणतात "प्रादेशिक वाड्.मयात त्या त्या प्रदेशातील ग्रामविभागाचेच समुहदर्शन अभिप्रेत असते. आणि ग्रामीण वाड्.मयात त्या त्या ग्रामविभागातील व्यक्तिनिष्ठ जीवन अभिप्रेत असते." [4]

मराठी ग्रामीण वाड्.मयाला 1945 नंतर बहर आला मात्र ते हरिभाऊंच्या काळातील आहे. गांधीजींच्या राजकारणासह सर्व जीवनाला व्यापणाऱ्या दृष्टीने 1920 नंतर राजकीय परिस्थितीत झालेला स्थित्यंतराचा परिणाम सामाजिक दृष्टीवर झाला हेच वर्णन श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' मध्ये शेवटच्या टप्प्यामध्ये दिसते. याच काळामध्ये ग्रामीण साहित्य हे प्रादेशिक साहित्य या नावाने निर्माण होऊ लागले त्यामुळे साहित्यिकांची दृष्टी खेडयापाडयाकडे वळली. 1945 ते 50 च्या दरम्यान श्री.ना. पेंडसे व गो.नी. दांडेकर यांनी ग्रामीण जीवनावर लेखन केले. जीवनातील समस्या, सामुदायीक स्वरूपाचे ताण, निसर्ग, ग्रामीण भाषेची धाटणी याचा अनुभव कसदारपणे झाला आहे. दोघांच्या लेखनामध्ये जीवनवादी दृष्टीकोण व खांडेकरी तत्व दिसते. हिंदु-मुस्लीम संबंध, नव्या-जुन्याचा संघर्ष, जय-पराजय, जीवन मूल्यांची जोपासना, मांगल्यावरचा विश्वास, अफाटतेची स्वप्ने वस्तुस्थितीमध्ये आणून पाहण्याची रोमॅन्टीक वृत्ती इत्यादी गोष्टींचा परिणाम श्री.नांच्या त्यावेळच्या लेखनावर झालेला दिसतो. आणि तोच 'तुंबाडचे खोत' या कादंबरीमध्येही पाहावयास मिळतो.

प्रादेशिकता ही ग्रामीणतेतूनच निर्माण होते. दोन्ही एकसारख्याच मानाव्या लागतात. खरे तर श्री.नांच्या पासूनच प्रादेशिक कादंबरीला सुरूवात झाली आहे असे म्हणावे लागते. र.वा. दिघे, चिं.त्र्यं. खानोलकर, उद्धव शेळके, गो.नि. दांडेकर, आनंद यादव ह्यांच्या कादंबऱ्याही काही प्रादेशिकतेकडे झुकलेल्या दिसतात.

प्रादेशिकतेबद्दल आनंद यादव म्हणतात. "जी प्रादेशिक कादंबरी केवळ प्रादेशिक वैशिष्ठयांवर भर देऊन वास्तवाच्या पातळीवर, एखाद्या सामाजिक किंवा सांस्कृतिक प्रश्नावरच संपते. ती कादंबरी सामान्य ठरते. पण जी प्रादेशिक कादंबरी या वास्तवातून पलीकडे झेप घेऊन मानवी मनाची मूलभूत स्पंदने आणि गाभा गाठण्याचा प्रयत्न करते ती लक्षणीय ठरते." [5]

श्री.नांच्या प्रादेशिकतेचे वेगळेपण सांगताना डॉ. स.रा. गाडगीळ म्हणतात - "पेंडसे हे

प्रादेशिक कादंबरीकार म्हणून गाजले. पण हे वर्णन त्यांना स्वतःला फारसे आवडत नाही. प्रादेशिकता हे कलाकृतींचे स्वतंत्र मूल्य नव्हे.... पेंडशांचे हे म्हणणे खरे आहे लेखक कोणत्या प्रदेशाशी, त्या प्रदेशातील माणसांशी, त्याच्या आशा-आकांक्षांशी, त्याच्या वेदना-संवेदनांशी कितपत प्रामाणिक आहे याला महत्व आहे. केवळ प्रामाणिकपणाही पुरेसा नाही. त्या माणसाच्या अंतरंगात प्रवेश करण्याचे सामर्थ्य त्याच्या प्रतिभेत आहे की नाही यावर त्याच्या कलाकृतीचे महत्त्व अवलंबून असते. परंतु हे मान्य करूनही प्रादेशिकतेचे महत्व अमान्य करता येत नाही. विशिष्ठ प्रदेश आणि त्या प्रदेशाच्या मातीत वाढलेली माणसे त्यांच्या अंतरिक स्पंदनांचे, संवाद-विसंवादाचे मूळ आणि अदृष्ट साम्य साकार करणारा कलावंत हा सामान्य नव्हे एवढे निश्चित. पेंडशांच्या कादंबऱ्यांना जे अनन्यसाधारणत्व लाभले आहे, जो वैशिष्टयपूर्ण स्वाद लाभला आहे त्याचे रहस्य कोकणच्या अंतरंग दर्शनातच आहे हे विसरता येत नाही."[6]

गंगाधार गाडगीळ म्हणतात - "पेंडशांना नंदनवन सापडले ते हर्णैजवळच्या भौगोलिक त्रिकोणात."[7] डॉ. द.भि. कुलकर्णी म्हणतात - "भौगोलिकदृष्टया अस्तित्वात असलेला एक वैशिष्टयपूर्ण भू-प्रदेश, तेथील मानवसमूह, त्याची वैशिष्टयपूर्ण बोली, वैशिष्टयपूर्ण निसर्ग यांची अपेक्षा आपण प्रादेशिक कादंबरीकडून करीत असतो. या अपेक्षेला धरूनच प्रादेशिक कादंबरीत निसर्गसृष्टी हवी. ते एक महत्वाचे पात्र व्हावे असे आपण समजतो या असल्या अपेक्षा रास्तच असतात. प्रादेशिक कादंबरीत प्रादेशिक मनाचा सामुदायिक गजर ऐकू यावा लागतो.[8]

ग्रामीणतेचे जीवन हे व्यवसाय व ग्रामसंस्था यावर अवलंबून असते तर प्रादेशिकतेमध्ये निसर्गसानिध्य महत्वाचे वाटते. चि.त्र्यं. खानोलकरांच्या कादंबऱ्यामधून संपूर्ण कोकण पाहावयास मिळतो तर श्री.नांच्या कादंबऱ्यामधून येणारा संपूर्ण प्रदेश हा नुसता प्रदेश असत नाही, तर तो एक व्यक्ति होऊनच येतो.

ग्रामीण व प्रादेशिकतेच्या बदलांबद्‌दल रा.रं. बोराडे म्हणतात - "आजच्या ग्रामीण जीवनात स्थित्यंतरे होत असल्याची जाणीव मलाही आहे. पण हे स्थित्यंतर कोणत्या बाबतीत होत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. चावडीच्या ठिकाणी ग्रामपंचायत आणि पाटलांच्या ठिकाणी सरपंच आले. पण गंमत अशी की, ठिकाणापलीकडे व नावापलीकडे फारसा बदल झाल्याचे आजतरी दिसत नाही. पटक्याच्या ठिकाणी टोपी आली पण टोपी घालणारे डोके तेच आहे. मात्र त्याच्या जीवन जगण्याच्या पद्धतीत कसलाच बदल दिसून येत नाही. जो बदल आहे तो वरवरचा."[9]

श्री.नांच्या कादंबरी विश्वाकडे पाहिले की दोनच प्रदेशांमधले कथाविश्व दिसते. कोकणचे हिरवे वैभव आणि मुंबईचे चाळ जीवन. मात्र 'तुंबाडचे खोत'मध्ये अन्य प्रादेशिक जीवनाचे चित्र काढलेले दिसते. त्यांच्या प्रादेशिकतेचा विचार करताना डोळयासमोर कोकण उभे राहते.

'एल्गार'च्या प्रसिद्धीवेळी दिघ्यांनी प्रादेशिकतेचे दालन उघडले होते कोकणचे दर्शनही आले होत. श्री.नां.नीही कोकणचा प्रदेश निवडला. वाचकांनी हे साम्य जाणले आणि श्री.ना. प्रादेशिक कादंबरीकार ठरले. त्यांच्या 'एल्गार व हद्दपार' मध्ये वर्णनासाठी वर्णने ही प्रादेशिकतेतून येतात. नंतर मात्र श्री.नांच्या लेखनामध्ये ही चूक दिसत नाही. श्री.ना. माणसाकडे कोकणचा की मुंबईचा या दृष्टीने न पाहता पहिल्यांदा माणूस पाहतात व नंतर प्रादेशिकतेतून व्यक्तित्वाकडे पाहतात. कोकणचा प्रदेश तिथल्या व्यक्तींना आकार देतो भावभावनाशीही समरस होतो. त्यांना वैभव, दारिद्रय देतो. मुंबईसारख्या, इंग्लंड, अमेरिका सारख्या शहरातील भाग व्यक्तिजीवनाला आकार देतो. व्यक्तिमने व कथाविश्व कलावंत करतो. प्रादेशिकतेची वैशिटये मांडणाऱ्या कादंबरीकार म्हणावे. प्रत्येक कादंबरीमध्ये प्रदेश येतो म्हणून प्रत्येक कादंबरीकारास प्रादेशिक कादंबरीकार म्हणता येत नाही.

हरिभाऊ जसे "सदाशिवपेठी" कारंबरीकार ठरतात तसे श्री. ना.चाळकरी कादंबरीकार ठरण्यास हरकत नाही. ते जसा कोकणचा प्रदेश जीवंत करतात तसा मुंबईतील चाळीचाही जीवंतपणा ठेवतात. त्यामुळे श्री. ना. ना दोन्ही प्रदेश डोळयासमोर ठेऊन प्रादेशिक कादंबरीकार म्हणावे लागते. श्री.नांची पात्रे कोणत्या प्रदेशातील याचा विचार केला तर त्या व्यक्तिरेखा मनाचे प्रतिनिधीत्व कर.तात. त्यासाठी निसर्गही एकरूप दिसतो. मानवाच्या स्थायी भावनांना गर्द किंवा फिकट करणे एवढेच प्रदेश करू शकतो. कोकणचा माणूस तिथल्या प्रादेशिक स्थितिमुळे घडतो.

श्री.नांच्या प्रादेशिकतेबद्दल डॉ. रविन्द्र शोभणे म्हणतात – "स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीचा विचार करावयाचा झाल्यास एक महत्वाचे कादंबरीकार म्हणून पेंडशांचा विचार केला जातो. किंबहुना प्रादेशिक कादंबरीकार म्हणून सुद्धा त्यांचा विचार तितकाच महत्वपूर्ण ठरतो. प्रादेशिकतेच्या संदर्भात पेंडशांनी जरी आपल्या कादंबऱ्यांकडे दुय्यम मुल्य म्हणून पाहिले तरीही या कादंबऱ्यांना त्यांच्यातील प्रदेशापासून कधीच विभक्त करता येत नाही. पेंडशांच्या वाङ्मयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा प्रादेशिकतेच्या पलीकडचा आहे. हे जरी मान्य केले तरीही प्रादेशिक कादंबरी म्हणून पेंडशांच्या कादंबरीचे किमान मर्यादेपर्यंत मूल्य मानावे लागते."[10]

श्री.नांच्या कादंबरीचा परिसर मुर्णे, दापोली, गारंबी, आंजर्ले, तुंबाड, लिंबाड हा कोकणचा प्रदेश आहे. लव्हाळी, आक्टोपस, आकांत या कादंबऱ्या सोडल्या तर 'एल्गार ते गारंबीची मध्ये कोकणचा प्रदेश दिसतो. त्यांनी रंगविलेला कोकणप्रदेश हा स्वातंत्र्योत्तर पूर्व कालखंडातील आहे. मात्र समाजपरिवर्तन व बदलत्या काळातील मूल्यव्यवस्था व्यक्तिचित्रांतून 'तुंबाडचे खोत' मध्ये स्थित्यंतर झालेले दिसते.

श्री. नांच्या कादंबरीतील 'माणसे' ते कोकणच्या प्रदेशामध्ये कुठल्याही माणसाची कुंडली घेऊन हर्णेच्या भौगोलिक त्रिकोणात येताना दिसतात. 'एल्गार ते रथचक्र' या प्रादेशिक प्रवाहानंतर ते 'लव्हाळी, आक्टोपस, आक्रान्त मध्ये मुंबई परिसर घेतात. पण या तिन्ही कादंबऱ्या कुटुंबकथा ठरत नाहीत. मात्र पुन्हा आपल्या प्रादेशिक मर्यादांची जाणीव ठेवून पेंडसे 'तुंबाडचे खोत' लिहून पुन्हा कुटुंबकथेच्या प्रांतात येतात. श्री. नां. चे हे बालपणातील नंदनवन आहे. श्री. नां. च्या कादंबऱ्यांतून त्यांचे आत्मचरित्रच प्रकट झालेले दिसते.

श्री. नांच्या 'तुंबाडचे खोत' च्या प्रादेशिकतेबद्दल डॉ. रविंद्र शोभणे म्हणतात – 'तुंबाडचे खोत' ही पेंडशांची अगदी अलीकडची दिर्घ कादंबरी. पेंडसे यात चार पिढयांची कथा आपल्या पद्धतीने सांगतात, पण इथे आपण जेंव्हा कलाकृती म्हणून या कादंबरीचा विचार करतो. तेंव्हा पेंडशांच्या यापुर्वीच्या कादंबऱ्यांशी केवळ तिचे नातेच नाही, तर या चार पिढ्यात लेखकाने यापुर्वी जे सांगितले त्याच्या फारसे पुढे ते जात नाहीत. सामाजिक, राजकीय स्थित्यंतराचा अन्वय लेखकाने या चार पिढ्यांशी लावला आहे. हा अन्वय कलाकृतीच्या ओघात आला असे म्हणण्यापेक्षा चार पिढयातील खांदेपालट करण्याकरिताच आवश्यक होता असे म्हणावे लागते."[11]

प्रादेशिक कादंबरीमध्ये भू–प्रदेश, निसर्ग याबरोबर माणूस हा ही महत्वाचा घटक असतो. श्री. नां. ची माणसावरच अधिक श्रद्धा आहे. थॉमस हॉर्डीच्या कादंबऱ्या जशा इंग्लंडमधील 'वेसेक्स' परिसराशी निगडीत आहेत तशाच पेंडशांच्या कादंबऱ्या 'कोकण'च्या परिसराशी निगडीत आहेत. पेंडसे पूर्व व पेंडसे उत्तर अशी प्रादेशिक कादंबरी पाहिली तर पेंडसे पूर्व ही रोमॅन्टीक कादंबरी होती. ती पेंडशांच्या 'गारंबीचा बापू' नंतर मात्र ती बदलली आणि प्रादेशिकतेचा प्रवाह इतर कादंबरीकारांनीही पेंडशानंतर चालू ठेवला. श्री. नांची ग्रामीण व प्रादेशिक अशी 'तुंबाडचे खोत' ही कादंबरी ग. दि. माडगुळकर प्रतिष्ठान पुरस्कार आणि प्रियदर्शनी अकादमी पुरस्कार प्राप्त झालेली दिसते.

श्री. नांच्या 'तुंबाडचे खोत' या द्विखंडात्मक, चार पिढ्यांचा इतिहास सांगणारी, 1357 पृष्ठांची कादंबरी या पलीकडे वाङ्मयीन महात्मतेच्या संदर्भात या कादंबरीला फारसे श्रेय लाभत नाही. मात्र वयाची पंच्याहत्तरी गाठल्यावर केलेले लेखन हे किमान त्यांच्या सर्वश्रेष्ठ कृतींच्या बरोबरीचे तरी पाहिजे होते. खूप व्यक्ति नानाविध स्थळांचा वापर करणे म्हणजे कलाकृतीच्या श्रेष्ठतेचे गमक नव्हे.

श्री. नांच्या 'तुंबाडचे खोत' मध्ये 'एल्गार ते रथचक्र'चा अनुभवाचा विस्तीर्ण प्रांतच इथे पाहावयास मिळतो. 'एल्गार'चा काही भाग हाताशी धरलेला दिसतो. त्यामध्ये रघु बेंद्रे, हसनमियाँ,

कादर, काशीराम यांची 'एल्गार' मधीलच पुनरावृत्ती दिसून येते. त्यामुळे 'तुंबाडचे खोत' ही अपयशी कादंबरी वाटते.

श्री.नांच्या प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये निसर्ग व भुगोल हे अविभाज्य घटक आहेत. वयाच्या दहा-अकरा वर्षाच्या जडणघडणीचा कालखंड हाच भौगोलिक त्रिकोणातून आलेला प्रादेशिकतेचा परिसर आहे. निसर्गाला मानवी व्यक्तिमत्वाचा भाग बनविलेले दिसते. त्यांच्या कादंबऱ्या स्वातंत्र्योपूर्व कालखंडातील आहेत. भूप्रदेशाचे नाते मात्र त्यांनी प्रामुख्याने व्यक्तीशी जोडलेले आहे. ग्रामीण कादंबरी ही ग्रामीणत्वाच्या मर्यादा ओलांडून प्रादेशिक कादंबरीचे रूप घेऊ शकते. व्यंकटेश माडगुळकरांची 'बनगरवाडी' ग्रामीण व प्रादेशिकतेमध्ये मोडताना दिसते. तशी श्री.नांची 'तुंबाडचे खोत' ही कलाकृती सुद्धा ग्रामीण व प्रादेशिकतेमध्ये झुकलेली दिसते. मराठी प्रादेशिक कादंबरीचा विचार करताना र.वा. दिघे, आण्णाभाऊ साठे, गो.नी. दांडेकर, श्री.ना. पेंडसे, रा.रं. बोराडे, चि.त्र्यं. खानोलकर, व्यंकटेश माडगुळकर आणि आनंद यादव यांचा विचार करावा लागतो. पाणकळा, सराई, पड रे पाण्या इत्यादी कादंबऱ्यांचे लेखन करणारे र.वा. दिघे हे पहिले प्रादेशिक कादंबरीकार ठरतात. मात्र खरी प्रादेशिक कादंबरी लोकप्रिय झाली ती श्री.नां.च्या कादंबऱ्यामुळे. त्यांनी 1949 पासून एल्गार, हद्दपार, गारंभीचा बापू. रथचक्र, कलंदर, तुंबाडचे खोत, एक होती आजी, गारंबीची राधा ह्या कादंबऱ्या लिहून श्री.नां.नी मराठी प्रादेशिक कादंबरी समृद्ध केली.

डॉ. दादा गोरे श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' बद्दल म्हणतात – "125 वर्षांचा अद्भूत घटनांनी भरलेला इतिहास तुंबाडच्या खातेमध्ये उभा राहतो. 'गारंभीचा बापू' मधील प्रणय एका वेगळया भोगवादी व्यक्तिरेखात, रूपात तुंबाडच्या खोतमध्ये आविष्कारित होते. काळा आणि पांढरा रंगही व्यक्तरेखांसाठी पेंडसे येथे वापरतात. पेंडसे यांच्या स्त्री व्यक्तिरेखा लावण्यवती आहेत. त्यांचा देह पुरूषाला घायाळ करणारा असतो. दादा खोतांची चौथी पत्नी गोदा ही 'राधा' सारखीच लावण्यवती आहे. ती स्वभावाने सालस तर दादा खोत पापी आणि भोगी आहे. भागीसह अनेक स्त्रिया दादा खोताच्या भोगदासी आहेत. या भोगवादी व्यक्तिरेखांच्या जोडीला दादा खोत आणि बंडू खोत हे भाऊ अघोरी पंथाचे उपासक आहेत. ते वझेभटाचा नरबळीसुद्धा देतात. बजापा खोत – जुलाली, चिमापा आणि गुलाब यांच्यासारख्या प्रणयकथाही येथे येतात. बजापा खोताच्या सुंदर देहभरल्या पत्नीवर (गंगू) चिमापा बलात्कारही करतो. पेंडसे आपल्या कादंबरीत अनेक व्यक्तींच्या पशुतुल्य कामजीवनाची चित्रे रेखाटतात. श्री.ना. पेंडसे यांच्या कादंबरीतील प्रणय, भोगवादी व्यक्तिरेखा, बलात्कार, अद्भुतता आणि निसर्ग शेवटी रंजनाच्या पातळीवरच राहतो. त्यामुळे

श्री.ना. पेंडसे यांची कादंबरी वाचनीय होते. तिला प्रचंड वाचक वर्ग मिळतो. असे असले तरी निव्वळ ललितकृती म्हणून ती उभी राहात नाही." [12]

कोकणचा प्रदेश, निसर्ग आणि माणसे मराठी साहित्यात अनेक लेखकांनी उभी केली आहेत. कोकणातील लेखक श्री.ना. पेंडसे, चि.त्र्यं. खानोलकर, जयवंत दळवी यांना कोकणच्या माणसातील हा भोगवादच लेखन विषय आहे. त्यांच्या लेखनामध्ये वासना हीच केंद्रस्थानी असल्याचा प्रत्यय येतो.

स्वत: श्री.ना. एक मित्र मध्ये प्रादेशिकते बद्‌दल म्हणतात "प्रादेशिकता म्हणजे केवळ निसर्गवर्णन नव्हे हे ही लक्षात ठेवावे लागते. शिरूभाऊंनी कोकणी माणसाची नस इतकी नेमकी पकडलेली आहे." [13]

श्री.नां. ची 'तुंबाडचे खोत' ही ग्रामीण व प्रादेशिक कादंबरी क्रमाने पाहिले तर ती अकरावी कलाकृती ठरते. 1358 पृष्ठांची दोन खंडांमध्ये प्रकाशीत झालेली चार पिढयांचे कथानक सांगणारी कादंबरी आहे. जगबुडीच्या काठावर असलेल्या प्रत्यक्षातील आयनी या गावावरून 'तुंबाड' कल्पिलेले आहे. त्यातूनच तुंबाड व लिंबाड या दोन शाखामध्ये विभागणी होऊन त्यानुसारच आसपासचा परिसर आलेला दिसतो.

'तुंबाडचे खोत' मध्ये 'घराण्याच्या शोधात' या पहिल्या प्रकरणामध्ये मुंबईहून भाऊसाहेब दीक्षित घराण्याच्या शोधासाठी तुंबाडला येतात. त्यांना बाबल्याशेट तुंबाडच्या घराण्याचा इतिहास सांगतात मात्र बाबल्याशेट या घराण्यातील व्यक्ति नसतात. मात्र भाऊसाहेब बंडूचे पणतू असूनही त्यांना माहिती नसणे आश्चर्यकारक वाटते. खरे पाहिले तर श्री.नां. नी हे प्रकरण विनाकारण वाढवून पस्तीस पानांची भर केलेली दिसते.

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' मध्ये 'एल्गार ते रथचक्र' मधील सर्व येताना दिसते. त्यामध्ये फक्त राजकीय चळवळ एवढाच भाग नवीन दिसतो. 'तुंबाडचे खोत' चे कथानक पेशवाईचा अस्त होऊन इंग्रजी अमदानीचा कालखंड दिसतो. शिवाजीराजांनी 1673 मध्ये दाभोळला गेल्यावर एका खोताचा सत्कार केला. मोरया खोत याने खोतीपरंपरा चालू केली. त्याचाच वंशज भिकाजीपंत खोत पानीपतमध्ये लंगडा होतो आणि त्याचीच मुले पुढे दादा, बंडू, नाना खोत परंपरा चालवितात.

श्री.ना. 'तुंबाडचे खोत' च्या ग्रामीण व प्रादेशिकतेमध्ये प्रामुख्याने व्यक्ति ही ग्रामीणतेचे व प्रादेशिकतेचे दर्शन घडविताना दिसते. 'तुंबाड'मध्ये खोती परंपरा असते. दादा व बंडू खोत यांच्या अघोरी उपासनेमध्ये बैराग्याच्या सांगण्यावरून वझेकाका या म्हाताऱ्याचा नरबळी देतात तो वझेकाका मोडलिंबचा पाककलेत पटाईत असतो. अघोरी उपासनेच्या भितीमुळे नाना खोत

'लिंबाड'ला राहण्यास जातो. तुंबाड आणि लिंबाड असे विभाजन होते. मात्र अघोरी उपासनेमुळे 'तुंबाड'चे वैभव नाहीसे होते. त्यामध्ये दादा खोताची चौथी पत्नी 'गोदा' हीची परवड होते. ती स्वतःच्या मुलाला मारण्याचा प्रयत्न करते. नंतर त्यालाच शिक्षण देऊन व्युत्पन्नशास्त्री पंडीत बनविते हेच कथानक 'गारंबीची राधा'मध्ये काही प्रमाणात 'राधा'चे दिसते. दोन्ही शाखामध्ये 'अविटघरचे जंगल' वादग्रस्त प्रकरण हे पुढील पिढयामध्ये दिसून येते. या तुंबाड व लिंबाड मध्ये जगबुडीचा उगम झऱ्याच्या स्वरूपाने झालेला दिसतो. तिचा प्रवास समुद्रसपाटीपर्यंत गेलेला दिसतो. तुंबाड व लिंबाडला जगबुडीचे पात्र भौगोलिक आकार देताना दिसते. जगबुडीच्या काठी तुंबाडचा धक्का दिसतो. तिथेच बोटीतून मालाची आयात-निर्यात होताना दिसते पुढे लिंबाडमध्येही नरसूखोत अशाच प्रकारे मालाची आयात निर्यात करताना दिसतो. याच जगबुडीची वैशाखी पौर्णिमेला स्तोत्र पुटपुटत, सुकड टाकून पुजा केली जाते त्यातुनच प्रतिष्ठेचा भाग येत असे. त्यासाठी लिंबाडला ही पूजा सुरू होते. नंतर बांडेसरकार, विनू आचारी हे सुद्धा प्रतिष्ठेसाठी वैशाखी साजरी करताना दिसतात.

श्री.नां.च्या 'तुंबाडचे खोत' मध्ये तुंबाड, लिंबाड बरोबर त्यांच्या आसपासचा प्रदेश म्हणून मोडनिंब, बांडेवाडी, वरणगाव, कुंभवणे, टेटवली, कऱ्हाड, राजापूर, मुंबई, कोळमांजरे, धरखांबीगांव, पोफळवणे, करवली, दाभाळेबंदर, अंजनवेल, गोपाळगड, हर्णे, हर्णेश्वर, श्रीवर्धन ही बंदरे, वावटळ, उपरीवाडी, हर्णेचा प्रदेश, फैजपूर, खानदेश, साखरपेंडी, गुळपेंडी, धोपडपेंडी, वरपेंडी, भागानगर, इंग्लंड, अमेरिका या प्रदेशाचे कादंबरीमधील व्यक्ति व प्रसंगांना धरून वर्ण्रन आलेले दिसते.

श्री.नांच्या या कादंबरीमध्ये 'मोडनिंब'चा कोकण प्रदेश हा प्रामुख्याने वझेकाका, वझ्या भट या व्यक्तिंच्यासाठी आलेला दिसतो. वझेकाका हे आचारी असतात. पाककलेमध्ये प्रसिद्ध असतात. मात्र म्हातारपणी लुळे होतात. तेंव्हा पुतण्याच्या साह्याने गिऱ्हाडीला नरबळी दिला जातो. वझ्या भटास त्यासाठी जमीन बक्षीस मिळते. टेंभुर्णीचे दर्शन हे प्रत्येक व्यक्तिचे श्रद्धेचे स्थान दिसते. त्यातूनही प्रादेशिकता दिसून येते. ह्या प्रकरणामधून तुंबाडची पहिली पीढी संपते आणि वैभवही संपते. तेंव्हा दुसरी पीढी गणेशशास्त्री तुंबाडकर या नावाने सुरू होते. फक्त लिंबाडमध्ये खोत हे आडनांव राहते. बांडेवाडी ही बांडयांचे राममंदीर व दर्ग्यासाठी प्रसद्धि असते. तेथे बांडेसरकारांचे वजन असते. हे बांडेसरकार घराणे तुंबाडकरांनी मदतीचा हात देताना दिसते. हे बांडे राजकीय, सामाजिकतेमध्ये भाग घेताना दिसतात. त्यामध्ये तुंबाडचे हायस्कूल, रामनवमी उत्सव, वैशाखीचा थाट यामध्ये व व्यापारामध्येही भाग घेताना दिसतात.

वरणगावचे इनामदार घराणे त्यामध्ये गणेशशास्त्रींची मुलगी ताई वरणगावच्या

इनामदारांच्या घरी सून म्हणून जाते. पण तीला काही काळानंतर खोटे सौभाग्य घेऊनच समाजामध्ये वावरावे लागते. तिचा पती नाहीसा होतो. पुन्हा ती तुंबाडला येते वडीलांच्या स्मरणार्थ काढलेल्या हायस्कूलमध्ये शिकविण्याचे काम करते. तेंव्हा इनामदार घराण्याला स्त्रीने घराबाहेर जाणे शोभत नाही असे इनामदारांचे पत्र येते मिळणाऱ्या इस्टेटीला ठोकरून ती शिकविते. पुढे इनामदार घराण्यामध्ये इस्टेटीच्या वादातून भाऊबंदकीमध्येच खून पडतात. कोळ मांजऱ्याचे मुसलमान त्यांना मुसलमान व्हावे लागते. परंतु ते रामनवमीच्या उत्सवात सहभागी होऊन मदत करताना दिसतात.

जनशास्त्री उकिडवे हे गणेशशास्त्री यांचे गुरू असतात ते टेटवलीचे परंतु तुंबाडमध्ये जेंव्हा हायस्कूल होते तेंव्हा त्यांचा वंशज नरूशेट उकिडवे गणेशशास्त्रींचे नांव आणि टेटवली तुंबाड ऐवजी लावण्यासाठी हक्क सांगताना दिसून येतो. गणेशशास्त्रींचा मुलगा जनापा हा कऱ्हाडच्या रोडके बरोबर ढोरांचा व्यवसाय करताना दिसतो. मात्र त्यामध्ये त्याची फसवणूक होते. राजापूरच्या मारवाडयाबरोबर भागीदारीत वीट कारखाना काढतो त्यामध्येही नुकसान होते. 'तुंबाडचे खोत' मध्ये मुंबईचा परीसर आला आहे. तो जुलाली या गानसम्राज्ञीच्या रूपाने. जुलालीची मैफील ऐकण्याची नरसू खोताला आवड असते. तो बजापाला घेऊन मैफलीमध्ये जातो. मात्र तेथे बजापा व जुलालीचे सूत जमते आणि ही जोडी 'गारंबीचा बापू' मधील राधा–बापू च्या रूपाने पुन्हा या कादंबरीमध्ये येताना दिसते. या रंगतदारपणामुळे ही श्री.नांची कादंबरी वाचनीय होते. जुलाली–बजापा यांना तुंबाडला येण्याची ओढ दिसते. त्यामुळे मुंबई दर्शनामुळे ग्रामीण व प्रादेशिकतेला तडा गेलेला दिसत नाही. तसा विचार केला तर ही जुलालीच खोटी वाटते. जुलाली मैफलीमधून अफाट पैसा मिळविते. तो बजापा तुंबाडला आणून परिस्थितीत सुधारणा करतो. खाजणाचे काम, बंगला, घड्याळे, प्रीझम इत्यादी वस्तू न पाहिलेल्या आणतो. जनापाचा मुलगा विश्राम जुळे चुलत्यांच्या खराब वर्तनामुळे तुंबाड सोडून राजद्रोह स्विकारतो आणि स्वातंत्र्य चळवळीमध्ये सामील होतो. त्यामध्येच मृत्यू पावतो. श्री.नांनी ही एक नवीनच व्यक्तिरेखा या कादंबरीमध्ये उभी केली आहे. जनापाची बायको विश्रामच्या नाहीसे होण्याने विंचूर्ल्याच्या खाडीमध्ये नग्न अवस्थेत आत्महत्या करते. विश्राम जेंव्हा साहेबाच्या विरूद्ध आवाज उठवितो तेंव्हा त्याला पंढरपूरला बैराग्याच्या अवस्थेत अटक होते.

श्री.नांनी प्रादेशिकतेमध्ये काळेमांजऱ्याचा भाग, मोरयाचा बरकस (माळ) मोरयाची पाखाडी, धरखांबी गांव, जगबूडीच्या पात्राला लागूनच नारभटाचा दर्गा, सभोवती बगवळ, घाणेरी, करवंदी ह्यांच्या किर्र झाड्या, त्यामध्ये डुकरे राहात असत. ह्याच ठिकाणी डुकरांची शिकार करण्यासाठी बजापा व शिवाजीराव जात. त्याच ठिकाणी पोफळवण्याची व करवलीची या दोन खिंडी रानडुकरांची या ठिकाणाहूनच ये–जा होत असे. तुंबाड लिंबाडच्या परिसरामध्ये पोफळी व सुपारीच्या

बागा पाहावयास मिळतात. हिर्डांचा व्यापार दिसतो. तुंबाडहून मुंबईला प्रवास करताना दाभोळबंदर, अंजनवेल, गोपाळगड, हर्णे, हणेश्वर, श्रीवर्धन बंदरे पाहावयास मिळतात. कुंभवणे तालुक्याच्या पूर्वेला डोंगराच्या पायथ्याशी वावटळ हे गांव तेथील नरूशेट मयेकर यांचे भजनीमंडळ हे प्रसिद्ध दिसते. त्यास साथ नामू शिर्शेकराच्या मृदंगाची. दोघेही माडीचा व्यवसाय करणारे. नरूशेट मयेकर कॉंग्रेसच्या चळवळीमध्ये बापू वकील आणि नरसू खोत यांच्याबरोबर सहभागी होतात. मात्र दारूबंदीच्या गांधीजींच्या उठावाला विरोध करतात. कॉंग्रेसच्या सत्याग्रहावेळी येरवडा जेलचे वर्णन येते त्यामध्ये बापू वकील, नरसू खोत व नरूशेट मयेकर यांना अटक होते. तेथे बापू भंग्याचे काम करण्यासाठी उपोषण करताना दिसतात.

चिमापाचा मुलगा अनंता मॅट्रीक झाल्यावर नरसूच्या सल्ल्याने अप्पाशेट पडवळांच्याकडे कामाला जातो. तेथे कॉन्ट्रॅक्ट मिळवितो. त्याचे आणि महादूशेट पडवळांची मुलगी अनू या दोघांचे प्रेम जमते. मात्र चिमापा व महादूशेट ते सफल होवू देत नाहीत. त्यामध्ये जातीयता नडते. तेंव्हा अनंता दारू पिऊन ज्या ठिकाणी गणेशशास्त्रींनी रोग्याला औषधोपचार केला त्याच धर्मशाळेत झिंगत पडतो. बजापाचा मुलगा ओडूल त्याला सुधारण्याचा प्रयत्न करतो. मात्र तो असफल ठरतो. आप्पाशेट पडवळ हे वावटळचे पण ते नामांकीत कॉन्ट्रॅक्टर असतात. 'डाळींबीचा पूल' बांधून प्रतिष्ठा मिळवितात पण त्यात खोट बसते. तुंबाडचे हायस्कूलची इमारत तेच बांधतात. मात्र बजापाचा बंगला बांधण्यासाठी नकार देतात. त्यांचा मुलगा संताजी सावरकरवादी होतो जेंव्हा ताराबरोबर लग्न करतो तेंव्हा कॉन्ट्रॅक्टर बनतो.

साखरपेंडीचे आप्पा बेडेकर दाम्पत्य बजापाचा मुलगा ओडूल (विठ्ठल) याला मुलगी देऊन त्याच्याजवळच घरसासरे म्हणून राहतात. त्याच्या इस्टेटीची देखभाल करतात. त्यांची मुले डॉक्टर इंजिनियर होतात. नरसू खोत श्रीमतीच्या बिनबूडाच्या आळामुळे मामलेदार कचेरीवर बैराग्याच्या वेशात झेंडा लावताना धारातीर्थी पडतो. साखरपेंडीचे नरसिंहशास्त्री काशीकर यांचा मुलगा चंदुभैय्या यांच्याबरोबर चिमापाची मुलगी 'तारा' हिचे लग्न होते. परंतु हीच तारा साखरपेंडीहून निघून येऊन संताजी पडवळ बरोबर ओडुलच्या मदतीने बापूंच्या माळावर एक रोप लावून लग्न करते. तिला झालेला मुलगा आपला वंशज असावा म्हणून नरसिंहशास्त्री काशीकर मागणी करताना दिसतात.

साखरपेंडी, गुळपेंडी, घोपडपेंडी, दरपेंडी हा परिसर यात्रेच्या निमित्ताने एकत्र येताना दिसतो. कुंभवण्याच्या शेजारील बांडेवाडी व उपरीवाडी या दोन्हीमध्ये जातीयतेमधून विभागणी पहावयास मिळते. बांडेवाडीमध्ये बांडेसरकार, खाणवकील प्रतिष्ठित दिसतात तर उपरेवाडीमध्ये

संपूर्ण मुसलमान लोक दिसतात. मात्र ते हिंदुत्ववादीही असलेले दिसतात. ते रामनवमीच्या उत्सवामध्ये भाग घेताना दिसतात.

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' मध्ये हर्णेचा प्रदेश येतो. खरेतर श्री.नांचे प्रादेशिकतेचे लेखन हे हर्णेच्या भौगोलिक त्रिकोणामध्ये झालेले दिसते. कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या निमित्ताने फैजपूर व खानदेशचे वर्णन आलेले दिसते. त्यासाठी नरूशेट मयेकर व नरसू खोत जातात. गांधीवादी म्हणून स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतात. तर चिमापा सावरकरवादी म्हणून भागानगरच्या सत्याग्रहामध्ये सामील होतो. ते स्वतःच्या प्रतिष्ठेच्या नावाखाली मात्र जाताना मनमाडपर्यंत नरसू खोतास सोबत नेतो.

नरसूचा मुलगा 'बाळाजी' डॉक्टर होतो. मात्र त्याचे प्रेम काळया बिंद्रया ख्रिश्चन नर्सबरोबर प्रेम जमते व तिच्याबरोबरच लग्न करतो. तिच्या ख्रिश्चन धर्मात सहभागी होतो. नंतर इंग्लंडला तज्ञ डॉक्टर होण्यासाठी जातो. त्याच्या अनुरोधाने इंग्लंडचे वर्णन येते तर ओडूलचा मुलगा अमेरिकेमध्ये इंजिनियर होऊन तिथल्याच मुलीबरोबर लग्न करून तेथेच स्थायिक होतो. मधू खोताची दोन मुले वऱ्हाडामध्ये स्थायीक होतात. मात्र प्रत्येक वेळी वैशाखीला लिंबाडला येताना दिसतात.

श्री.नां.नी 'तुंबाडचे खोत' मध्ये भोगवादी वृत्तीचे वर्णन केलेले दिसते. त्यासाठी त्यांनी व्यक्तिंना काळे-पांढरे रंग दिलेले दिसतात. 'गारंबीचा बापू' मधील 'राधा'चे सौंदर्य 'तुंबाडचे खोत' मधील 'गोदा'मध्ये सौंदर्य पाहावयास मिळते. मात्र ही गोदा सालस दिसते तर तिचा पती दादा खोत हा कामवासनेला चटावलेला काळाबिंद्रा नखरेल पुरूष वाटतो. त्यांनी पंढरी पाणक्याची बायको भोगदासी बनविली. तिच्याप्रमाणेच तुंबाडमध्ये मनामध्ये भेटेल ती बाई त्याला हवी असे. तसाच बंडू खोतही पाहावयास मिळतो.

तुंबाड-लिंबाडच्या शाखामध्ये कामवासनेचे अग्निकुंडच पाहावयास मिळते. एवढेच की लिंबाड शाखेमध्ये त्याचे प्रमाण थोडे कमी दिसते. जनापा खाजनाच्या कामावेळी वडारणीबरोबर संबंध ठेवतो तर घरामध्ये चीमापाच्या बायकोबरोबर गोठयात जाताना दिसतो. शेवटी त्याची बायको मेल्यावर सखुताईच्या मानीच्या नादी लागतो. त्यामध्ये त्याला सखुताई व मानी पाहिजे तसा लुटतात आणि शेवटी मानीचा प्रियकर मुंबईवाला जनापाचा मोरयाच्या पावलावरच खून करतो.

चिमापा व गुलाब प्रकरण दिसते. तेली गल्लीतील गुलाब हिच्यासाठी खाणवकील झटत असतो पण चिमापा तिला मिळवितो इस्टेट देण्याचे कबूल करतो. चिमापा - गुलाब संबंध जुळतात. खानवकीलाचा चिमापावर डोळा असतो. ज्यावेळी गांधीजींचा वध होतो तेंव्हा गांधीवधाचे कारण

घेऊन तुंबाडकरांची होळी होते. त्यामध्ये वखार, वाडा जळून खाक होतो. तुंबाडमध्ये 'गोटा' प्रकरण तर लिंबाडमध्ये 'वरंड' प्रकरण कामवासनेसाठी फेमस दिसते. चिमापा तर बजापाची बायको गंगावर भर दिवसा वखारीमध्ये बलात्कार करताना दिसतो.

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' मध्ये एक नवीनच भाग आलेला दिसतो. तो थोडया प्रमाणात 'लव्हाळी' या अप्रादेशिक कादंबरीत आलेला दिसतो पण इथे मात्र ग्रामीण व प्रादेशिकतेतून ठळकपणे उमटलेला दिसून येतो. त्यामध्ये भारतीय राजकारणातील टिळक पर्व, गांधी पर्व, सावरकर पर्व पहावयास मिळते. त्यातूनच पुढे सत्याग्रह, स्वातंत्र्य चळवळी, त्यातून झालेले तुरूंगवास, मृत्यू पाहावयास मिळतात. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व राजकारणातील चढउतारही दिसून येतात. चार्वाक, फुले, आंबेडकर, सावरकर, गांधी यांची तात्विक भूमिका यातून प्रादेशिकतेचे व ग्रामीणतेचे दर्शन घडते. हे सर्व तुंबाड-लिंबाडच्या परिसरातील व्यक्तिंच्या सहवासाने होताना दिसते.

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' मध्ये प्रणय, भोगवादी व्यक्तिरेखा, बलात्कार, अद्भुतता आणि निसर्ग शेवटी रंजनाच्या पातळीवरच राहतो. 'एल्गार ते रथचक्र' यातील प्रादेशिकतेची व ग्रामीणतेची राजकीय चळवळीचा भाग सोडला तर पुनरावृत्ती झालेली पहावयास मिळते आणि संपूर्ण कादंबरीमधील ग्रामीण व प्रादेशिक दर्शन हे त्यामधील व्यक्ति व प्रसंगावरूनच घडत असते. स्वतः श्री.ना. ही कोकणच्या प्रदेशावरच जास्त भर देताना दिसतात.

श्री.नांच्या 'तुंबाडचे खोत' मधील ग्रामीण व प्रादेशिकतेचे मूल्यमापन केल्यानंतर त्यांच्या 'तुंबाडचे खोत' मधील समाजजीवन, कुटुंब जीवन, रूढी, परंपरा, श्रद्धा याचा परिचय करून घेणे महत्वाचे ठरते. ग्रामीण व प्रादेशिकतेतूनच त्यांचा उगम झालेला दिसून येतो.

****

## – संदर्भ सूची –


| अ.नं. | संदर्भ ग्रंथ | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| 1. | ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध | डॉ. नागनाथ कोत्तापल्ले | 2 |
| 2. | मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास | बापट/गोडबोले | 244 |
| 3. | प्रतिष्ठान नोव्हें–डिसें. 1996 प्रादेशिक कादंबरी : एक आकलन | डॉ. दादा गोरे | 45 |
| 4. | ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या | डॉ. आनंद यादव | 65 |
| 5. | – " – | – " – | 81 |
| 6. | प्रतिष्ठान : फेब्रु–मार्च–एप्रील 1964 | – " – | 54/55 |
| 7. | खडक आणि पाणि | गंगाधर गाडगीळ | 333 |
| 8. | तिसऱ्यांदा रणांगण | डॉ.द.भि. कुलकर्णी | 97 |
| 9. | प्रतिष्ठान एप्रिल–मे 1965 | रा.र. बोराडे | 10 |
| 10. | कादंबरीकार श्री.ना. पेंडसे | डॉ. रविन्द्र शोभणे | 136 |
| 11. | – " – | – " – | 140 |
| 12. | प्रतिष्ठान नोव्हें. डिसें. 1996 प्रादेशिक कादंबरी : एक आकलन | डॉ. दादा गोरे | 47 |
| 13. | श्री.ना. पेंडसे लेखक आणि माणूस 'एक मित्र' | श्री.ना. पेंडसे | 435 |


–000–